महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

दुरध्वनी क्रमांक - 0257- 2220152 ई मेल - homebranchjalgaon@gmail.com

---

वाचले :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005

2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897

3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020

4. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/136, दिनांक 14 एप्रिल, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/138 दिनांक 14 एप्रिल, 2020

## शुध्दीपत्रक

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 14/04/2020 अन्वये जळगांव जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रातील सर्व किराणा मालाची दुकाने (घाऊक , किरकोळ), सर्व दुध विक्री केंद्रे, भाजीपाला विक्रेते, फळ विक्रेते, रस्त्यावर हातगाडीद्वारे विक्री करणारे फिरते विक्रेते, काही संस्थाद्वारे भरविण्यात येणारे बाजार, कोणत्याही प्रकारे रस्त्यावर अथवा गलोगल्ली जाऊन विक्री करणारे विक्रेते यांचे व्यवहार दिनांक 15 एप्रिल, 2020 पासून दिनांक 30 एप्रिल, 2020 पावेतो केवळ सकाळी 11.00 ते दुपारी 05.00 या वेळेतच सुरु ठेवण्याबाबत तसेच सर्व संबंधितांद्वारे देण्यात येणारी घरपोच सुविधा (होम डिलीव्हरी) देखील केवळ याच कालावधीत पुरविण्याबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद आदेशान्वये **सर्व दुध विक्री केंद्रे** यांच्या बाबतीत जळगांव जिल्हयातील दुध विक्रेते, नागरीक, व्यक्ती यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झाल्याचे निदर्शनास आले असून सदरचा संभ्रम दुर करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी , सदर नमूद आदेशात दुरुस्ती करण्यात येत असून **" सर्व दुध विक्री केंद्रे"** च्याऐवजी **"सर्व दुध विक्री केंद्रे म्हणजेच केवळ आणि केवळ दुध विक्री करणारी केंद्रे यांना सदर आदेशातील नमूद वेळेचे बंधन लागू असणार नाही. तथापि अशी दुध विक्री केंद्रे ज्या ठिकाणी दुध व त्यासोबत अन्य कोणत्याही पदार्थांची विक्री केली जाते (उदा. बेकरीचे पदार्थ, किरकोळ वस्तू व तत्सम पदार्थ) अशा दुध विक्री केंद्रांना मात्र आदेशात नमूद वेळेचे पालन करणे बंधनकारक राहील, असे वाचावे."**

(डॉ. अविनाश ढाकणे)

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. पोलीस अधिक्षक जळगांव
2. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
3. जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव
4. मुख्याधिकारी सर्व नगरपालिका / नगरपंचायत

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदर आदेशाचे स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी करावी.

Scanned with CamScanner